ISSN: 2230-7850 IMPACT FACTOR : 5.1651 (UIF) VOLUME - 7 | ISSUE - 4 | MAY - 2017

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

# बदलत्या ग्रामीण जीवनाचे वास्तव मांडणारी वामन होवाळाची कथा

श्री. हिराचंद्र रोहिदास मोरे
पीएच् .डी. संशोधक विद्यार्थी, मु.पो. पोखरापूर, ता. मोहोळ, जि. सोलापूर.

***प्रस्तावना :***

मराठी कथा विश्वामध्ये वामन गोविंद होवाळ यांचे नाव एक समर्थ कथाकार म्हणून घेतले जाते. वामन होवाळ यांचा जन्म 1 एप्रिल 1938 रोजी मुंबईत झाला. महात्मा फूले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब या राष्ट्रपुरुषांचे जीवन कार्य व विचारांनी भारावून जाऊन लेखन करणा-या वामन होवाळांनी वैविध्यपूर्ण आणि वैशिष्टयपूर्ण कथांची निर्मिती करुन केवळ दलित साहित्यालाच नव्हे तर मराठी साहित्याला समृध्द करण्यात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. रेल्वेमध्ये नोकरी करणा-या वामन होवाळांचे बेनवाड, येळकोट, वारसदार,वाटा-आडवाटा आणि ऑडिट हे कथा संग्रह प्रसिध्द आहेत. तसेच 'नाम्या म्हणे मी उपाशी','जपून पेरा बेनं','आंधळयाची वरात बहि-याच्या घरात' आणि 'अधेलीचं भांडण' ही लोकनाटये लिहिली आहेत. आणि आमची कविता हे कवितेचे संपादन प्रसिध्द आहे. तसेच त्यांना कथालेखन आणि कथाकथन यासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्याचबरोबर ग्रामीण साहित्य संमेलन, परिवर्तनवादी साहित्य संमेलन,आखिल भारतीय दलित साहित्य संमेलन, अस्मितादर्श साहित्य संमेलन इत्यादीचे अध्य राहिले आहेत.

दलित जाणीवा मांडणारा एक समर्थ दलित कथाकार म्हणून वामन होवाळांची ओळख असली तरी ग्रामीण माणूस, त्यांच्या वृत्ती प्रवृत्ती, तेथील समाज, तेथील संस्कृती यांची मांडणी त्यांनी विनोदी ढंगाने केलेली आहे. त्यामुळे वामन होवाळ यांची कथा दलित आणि ग्रामीण असे दोन्ही संदर्भ घेऊन येते.



त्यामुळे त्यांच्या कथा मराठी कथाविश्वात आगळयावेगळया ठरल्या आहेत.

वामन होवाळांनी ग्रामीण जीवनाला अनुभवल्यामुळे ते पुढे मुंबईत वास्तव्यास असले तरी आपल्या ग्रामीणतेची नाळ अखंड ठेवली आहे. ग्रामीण जीवनाला आणि तिथल्या बदलत्या वास्तवाला वामन होवाळांनी आपल्या लेखनाच्या केंद्रस्थानी ठेवले आहे. ग्रामीण जीवनातील बदलाचे वामन होवाळ साक्षीदार असल्याने या बदलाचे वास्तव रुप त्यांच्या वेगवेगळया

कथासंग्रहात उमटलेले दिसते. या ग्रामीण परिघातच वास्तव्य करणारा परंतु आपले अस्तित्व हरवून बसलेला दलित समाज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अंगिकारुन बदलू पाहत आहे. परंतु या समाजावर पूर्वपरंपरेपासून अधिराज्य गाजविणारा सवर्ण समाज त्यांच्या या बदलाला विरोध कसा करतोय ते अत्यंत उपहासात्मकतेने होवाळांनी चित्रित केले आहे. ग्रामीण भागात या बदलापासून अलिप्त राहून आपले पारंपारिक जीवन जगू पाहणारा दलित माणूस अजूनही बदल स्वीकारण्यास कसा प्रवृत्त होत नाही ते ही हावाळ तेवढयाच परिणामकारकतेने टिपतात. ग्रामीण जीवनात रुढी परंपरांचा मोठा पगडा असल्याचे दिसून येते.

वामन होवाळांची कथा ग्रामीण जीवनापासून शहरी जीवनापर्यंत मोठा आवाका घेऊन साकार होते. परंतु तिची संवेदनशीलता कायमच राहते. बदलत्या ग्रामीण जीवनाला साकारणारी होवाळांची कथा ग्रामीण समाजाच्या सांस्कृतिक परिघाचे यथायोग्य दर्शन घडविते. ग्रामीण समाजात भौतिकदृष्टया कितीही बदल झाला तरी तिथली दांभिकता व फसवेगिरी ही वृत्ती कशी कायम आहे ते ही वामन होवाळ प्रतिबिंबित करतात. ग्रामीण समाजात होणा-या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक बदलाचे वामन होवाळ अत्यंत प्रभावी चित्रण आपल्या कथातून करतात. या बदलाचा अंगीकार करु पाहणा-या माणसात कशापध्दतीने विसंगती निर्माण होत चालली आहे. ते वामन होवाळांनी विनोद आणि उपहासात्मकतेतून चित्रित केले आहे. पंचायतराज व्यवस्थेने ग्रामीण समाजात बदल घडून येण्याऐवजी भ्रष्ट आणि शोषण करणा-या यंत्रणाच कशा कार्यान्वित होत गेल्या ते हावाळ शब्दबध्द करतात. ग्रामीण समाजातील स्त्रीयाही कशा पध्दतीने बदलत आहेत ते त्यांच्या 'वसुली' (बेनवाड) या कथेतील 'सकनी'या स्त्रीव्यक्तिरेखेतून अनुभवास येते. तर आपल्या बेरकी वृत्तीने गावातील प्रतिष्ठित असणा-या हिंदुआवाला नमते घ्यायला लावून सगळया गावांना फसविणा-या चांडाळचवकडीलाही आपला इंगा दाखविणारी 'कुरघोडी' (बेनवाड) कथेतील 'आकनी' याचे उत्तम उदाहरण म्हणता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी बदलू पाहणारा दलित समाज वामन होवाळांच्या अनेक कथांतुन पहावयास मिळतो. वामन होवाळांनी दलित समाजात घडून येणा-या वैचारिक बदलाचे प्रत्यंतर आपल्या अनेक कथातुन दिलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी दलित समाजाला आत्मभान निर्माण करुन दिले. दलितांना बलूतेदारी सोडायला लावली, शिक्षण घेण्याचा आग्रहकेला. त्यामुळे दलित समाजात दारिद्रयापेक्षा आत्मसन्मानाची जाणीव रुजली. आत्मसन्मानाची जाणीव झाली तर आपले माणूसपण नाकारले जाणार नाही याची शिकवण दलित समाजाला दिली. परिणामत: ग्रामीण माणसाच्या वर्चस्वाला दूर लोटून नवा विचार घेऊन जगणारा दलित समाज निर्माण झाला याचे वास्तवपूर्ण आणि प्रत्ययकारी चित्रण वामन होवाळांच्या 'मजल्यावरचे घर' या कथेतून दिसून येते.

वामन होवाळांची कथा वर्तमान जीवनावर भाष्य करीत माणसाच्या जगण्यातील विदारक वास्तवाला वेगवेगळया अंगांनी प्रकट करते. ग्रामीण समाजात बदलत जाणारी मूल्यव्यवस्था, ग्रामीण समाजात बदलत जाणारी राजकिय विचारसरणी, समाजात वाढत जाणारी झुंडशाही, गुंडशाही आणि घराणेशाही यांच्या वर्चस्वाखाली सर्वसामान्यांची होणारी गळचेपी वामन होवाळांची कथा परिणामकारकतेने साकारते. आधुनिकीकरणाचा स्वीकार केल्यामुळे ग्रामीण दलित जीवनात बदल झाला खरा परंतु या बदलाने अभावग्रस्तता व दुभंगलेपणाच समाजात मोठया प्रमाणात कसा निर्माण होत गेला ते होवाळांची कथा दर्शविते.

आपले सबंध आयुष्य रानात घालवून घर उभे करणारा, आपल्या कष्टावर भावांचे संसार उभे करुन त्यांना शिकवून मोठया पदावर नोकरी लावणा-या शेतक-यांचे दु:ख वामन होवाळांच्या 'खोडा' या कथेतून चित्रित होते. शिकलेली पिढी आपल्या स्वार्थापोटी आपल्या शेती कसणा-या भावाला कशी गोत्यात आणते ते वामन होवाळांनी प्रभावीपणे रेखाटले आहे. समकालीन जीवनातील वेगवेगळयास्तरावरील माणसाच्या भावविश्वाला साकारणारी ही कथा दलित कथेत मौलिक स्वरुपाचे योगदान देणारी अशीच आहे.

रुढी आणि परंपरांची जोपासनारी माणसं होवाळांच्या लेखनीला बळ देतात. आपल्या उपजिवीकेची परिपूर्ती प्रसंगी चोरी करणारे अनेक लोक होवाळांच्या कथेला बळकटी देतात. 'साखरेचं खाणार' या कथेतील कल्या आणि लाल्या रामोशी यांचे जीवंत उदाहरण म्हणून विचारात घेता येतात. आपला हा व्यवसाय पुढे त्यांची पिढीही कशी करते ते दर्शवून होवाळांनी समाजातील भीषण वास्तव समोर मांडले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरीत झालेला तळागाळातील समाज सुधारणेच्या दिशेने प्रवाही होत असतानाच अशा मनोवृत्तीचे लोक अजूनही आपला मार्ग सोडण्यास कसे प्रवृत्त झाले नाहीत ते होवाळांनी दर्शविले आहे.

वामन होवाळांनी आपल्या कथातून दलित समाजातील या बदलाचा नेमकेपणाने आढावा घेतला आहे. होवाळ दलित समाज जीवनातील या बदलाला साकार करतानाच सवर्णात हा बदल स्वीकारण्याची मानसिकता निर्माण होत नाही म्हणून कटकारस्थाने करुन हे सवर्ण त्या दलित माणसाला कशी छळतात. त्याचे अत्यंत प्रभावी चित्र 'मजल्याचे घर' या कथेतून उभे केले आहे. मुंबईला आपली उपजिवीका करण्यासाठी गेलेला बयाजी निवृत्त होऊन गावी परत येतो व मजल्याचे घर बांधतो. गावात केवळ पाटलाचेच घर मजल्याचे असते. त्याला ही गोष्ट आवडत नाही. अस्पृयाने आपली बरोबरी करावी ही बाब सहन न झाल्याने तो करस्थान करुन बयाजीच्या घराला आग लावतो. त्या आगीत घराबरोबर बयाजीही जळून खाक होतो. परंतु बाबासाहेबांच्या विचाराचे वारे प्यालेली बयाजीची मुलं खचुन न जाता चिडून आपल्या वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्याकरिता पुन्हा मजल्याच्या घराची पायाभरणी करतात. हे दर्शवून होवाळांनी बाबासाहेबांच्या विचाराला अंगिकारलेली पिढी नवा आशावाद, नवे सांस्कृतिक जीवनसंदर्भ घेऊन कशी वाटचाल करत आहे याचा प्रत्यय येतो.

होवाळांच्या 'कुरघोडी' या कथेतील चांडाळचौकडी ग्रामीण समाजातील फसव्या आणि बेगडी मनोवृत्तीचे नेमके आणि प्रभावी दर्शन घडवितात. तर 'हिसका' या कथेतून साकाराणारा खंडू खरात ग्रामीण माणसाच्या चतुर आणि चाणाक्ष मनोवृत्तीचे दर्शन घडते. अस्पृश्यतेच्या दाहक अनुभवाचे प्रत्यंतर देणा-या काही मनोवृत्तीही अनेक कथांतुन येतात. आपला जीवनचरितार्थ भागविण्यासाठी पारंपारिक व्यवसायाचा त्याग करुन नवी विचारसरणी अंगिकारणा-या मनोवृत्तीचे नेमके चित्रण 'अंधश्रध्दा' या कथेतुन पहावयास मिळते. ग्रामीण समाजातील बेरकी आणि रांगडया मनोवृत्तीचे एकात्म चित्रण होवाळांच्या 'आतली टांग','पायताणाचा उतारा','खोडा','सोयरिक' अशा अनेकविध कथांतून घडते. वामन होवाळांनी माणसाच्या जगण्याच्या सखोल आणि चिंतनात्मक विचार कशा पध्दतीने केला होता ते या कथेतून पहावयास मिळते. होवाळांनी आपल्या कथांतून वेगवेगळया मनोवृत्तीला दर्शवून दलित-पिडीत आणि शोषित समाजातील माणसांच्या वृत्ती-प्रवृत्तीला साकारले आहे. या मनोवृत्तीतून ग्रामीण दलित माणसांचे वेगवेगळे स्वभावविशेष पहावयास मिळतात. या मनोवृत्तींच्या चित्रणामुळे ग्रामीण दलित माणसांच्या जाणीवा अत्यंत व्यापकपणे चित्रित होतात. माणसाच्या दु:खला साकारणारी ही कथा वास्तवाचा सखोल प्रदेश व्यापणारी अशी आहे.

आपण केवळ माणूस म्हणून लिहितो त्याचा जाती-धर्म पाहत नाही. अशी आपली लेखनाविषयीची भूमिका स्पष्ट करताना स्वत: वामन होवाळ म्हणतात,"कथाविश्वात प्रसंगोपात, हरिजन, अस्पृश्य, नवबौध्द, डॉ. आंबेडकरांनी दाखविलेल्या मार्गांनी जाणारे अशी माणसं आणि त्यांचे जीवनचित्रण अवश्य आहे; परंतु लेखक म्हणून केवळ त्यांच्या विषयी लिहिले नाही. दलित आणि दलितेत्तर असा भेद मी केला नाही. अन्याय करणा-या व्यक्ती आणि अन्याय करणा-या सामाजिक व सांस्कृतिक प्रवृत्ती यावर मी बोट ठेवले आणि अन्याय वृत्ती-प्रवृत्तींना बळी जाणा-या सामान्य माणसा-माणसाकडे माझी दृष्टी वळली."होवाळांनी आपल्या कथालेखनाची स्वच्छ निर्मळ वेगळेपणाला सिध्द होते. ती केवळ एका माणसाच्या किंवा विशिष्ट समाजाचे जीवन घेऊन प्रकटत नाही तर सबंध मानव विश्वाचे प्रतिनिधिक स्वरुपाचे चित्रण करते.

## समारोप

मराठी दलित कथेला दलित ग्रामीण जीवनाचे मूलगामी दर्शन घडविणारी होवाळांची कथा दलित कथेतील मैलाचा दगड ठरावी अशीच आहे. या कथेने समकालीन कथाकारांना एका अनोख्या विश्वाचे दर्शन घडविले आहे. वाचकांना रंगवून आणि गुंतवून ठेवणारी ही कथा मराठी नव्या प्रांताचे दालन वाचकांसमोर खुले करते. वामन होवाळांनी अशा वैविध्यपूर्ण आणि वैशिष्टयपूर्ण कथांची निर्मिती करुन मराठी कथेत मौलिक स्वरुपाचे योगदान दिले.

## संदर्भ -

1. बेनवाड - वामन होवाळ
2. येळकोड - वामन होवाळ
3. वारसदार -वामन होवाळ
4. वाटा आडवाटा - वामन होवाळ
5. ऑडिट - वामन होवाळ